REVIEW OF RESEARCH

ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 3.8014(UIF)
VOLUME - 6 | ISSUE - 6 | MARCH - 2017

# भारतीय संघराज्य समोरील आव्हाने

प्रा. पांडुरंग माणिकराव नवल
स्वामी विवेकानंद महाविद्यालय, मंठा
ता. मंठा जि. जालना.

## प्रास्ताविक :

भारतीय संघराज्याची निर्मिती करतांना राज्यघटनेत इंडीया दॅट इज भारत शाल बी युनियन ऑफ द स्टेट असा स्पष्ट उल्लेख करुन भारत हा राज्यांचा संघ आहे असे सांगितले आहे संघराज्या ऐवजी संघ हा शब्दप्रयोग अत्यंत महत्वपूर्ण ठरतो कारण संघांमध्ये एकात्मतेचा भाव दिसून येतो भारतातील धार्मिक सामाजिक राजकीय सांस्कृतिक परिस्थितीचा विचार करुन देशाला मानवास साजेल अशा तत्वांचा स्विकार संघराज्यात केला आहे. भारताला लाभलेल्या संमिश्र संस्कृतीचा वारसा आणि मोठा भुप्रदेश लोकसंख्या यांचा विचार करता सर्वांना जोडणारे एकात्मतेचे सुत्र म्हणुन डॉक्टर आंबेडकरांनी घटनेत संघराज्याचा स्विकार केला भारतीय संविधानात भाग 1 ते 4 मध्ये संघराज्य आणि राज्य क्षेत्र यांचे स्पष्टीकरण दिले आहे. अनुच्छेद 1 मध्ये इंडीया (भारत) 26 नोव्हेंबर 1947 रोजी संविधानाच्या संपुर्णचर्चेनंतर घटना मसुदा समितीचे



अध्यक्ष डॉक्टर बाबसाहेब आंबेडकर यांनी असे मत व्यक्त केले की भारत शांततेच्या काळात संघराज्य आणि आणिबाणीच्या काळात एकात्मराज्य असेल. म्हणजे भारत हे आभासात्मक संघराज्य आहे असे येथे दिसून येते विकेंद्रीकरणाच्या प्रवृत्तीतून संघराज्य निर्माण झाले असले तरी मध्यवर्ती सरकार प्रबळ बनवण्यात आले ओ याच कारणामुळे भारतात संधराज्याचे सुर निर्माण करुन देखील एकत्मस्वरुप साधता आले आहे. मायकेल स्टुअर्ट यांनी असे म्हटले आहे की भारत हे एकात्मक आणि संघात्मक पध्दतीचे मिश्रण आहे. याही पुढे जाऊन असे म्हटले आहे की भारत हे देखील एकात्मस्वरुप साधता आले आहे. त्यामुळेच भारतीय संघराज्याच्या निर्मितीपासूनच संघराज्याकडे शंकेच्यानजरेने पाहण्याचा दृष्टिकोन निर्माण झाला आहे आणि म्हणूनच तेव्हापासून प्रदेश वाद भाषावाद संस्कृतीवाद निर्माण झाला आहे. भारताच्या संघराज्याला प्रदेश वादाने आव्हान उभे केले आहे हे मान्य करावे लागते प्रमुख्याने आपल्या देशातील प्रादेशिक वाद हा भाषिक तत्वावर आधारित आहे. कारण प्रत्येक राज्याची निर्मिती ही भाषेमुळे झाली आहे. देशातील विविध ठिकाणचे लोक विविध भाषा बोलतात त्यामुळे आपली स्वतःची भाषा बोलणारा यांचा एक गट निर्माण होतो तो गट एक विशिष्ट क्षेत्र काबीज करतो आणि तो आपली भाषा आणि तेवढा काबीज केलेला भाग यावर अतिशय प्रेम करतो आणि आपण इतरांपेक्षा वेगळे आहोत आपली भाषा इतरांपेक्षा वेगळी आहे ही भावना निर्माण होते आणि त्यातून स्वतःच्या भाषेची अस्मिता तयार होते व स्वतःचे राज्य निर्माण व्हावे अशी मनोमन इच्छा त्या ठिकाणी वास्तव्य करणाऱ्यांच्या मनात उत्पन्न होते, आणि यातुन प्रादेशिक वाद निर्माण होतो अशाच प्रकारे आपल्या देशात विविध राज्यांची निर्मिती भाषा या घटकाला आधार म्हणून झाली आहे. मराठी भाषा महाराष्ट्र, कन्नड भाषा कर्नाटक, मणिपुरी भाषा मणिपूर, पंजाबी भाषा पंजाब वरील कारणांमुळे प्रादेशिक वाद निर्माण

होत असला तरी अनेक इतरही कारण प्रादेशिक वादाला कारणीभूत आहेत जसे की भाषावाद विकासातील असमतोल सांस्कृतिक विभिन्नता ऐतिहासीक वेगळेपण यासारख्या अने कारणांमुळे ही प्रादेशिक वादाचे आव्हान संघराज्य समोर निर्माण झाले आहे.

### संशोधन उद्दिष्टे :–

1) प्रादेशिक वाद मोठया प्रमाणात उफाळुन येत आहे
2) राष्ट्रीय भाषेचा अभाव म्हणून प्रादेशिक वाद निर्माण होत आहे का?
3) केंद्र – राज्य अधिकारावरुन संघर्ष होत आहे
4) राष्ट्रीय एकात्मता हे संघराज्याचे गाभा तत्व आहे

### संशोधनाची गृहितके :–

1) प्रादेशिक पक्ष संघराज्याच्या एकात्मतेवर गंभीर परिणाम करतात
2) भाषिक विषमता किंवा राष्ट्रीय भाषेवरील मतभिन्नता हे प्रादेशिक वादाचो कारण आहे
3) घटनात्मक अधिकारातील असमतोल प्रादेशिक वादास कारणीभूत आहे
4) केंद्र सरकार सुडबुध्दीने कायद्यांचा वापर करते

### प्रादेशिक वादाच्या निर्मितीची कारणे :–

प्रादेशिक वाद निर्माण होण्याची विविध पैलु आहेत. राज्यांनी किंवा काही राजकीय पक्ष संघटनांनी त्याचा फायदा घेवुन प्रादेशिक वादाला खतपाणी घातले आहे.

### 1) भौगोलिक विविधता :–

प्रादेशिकतेचा जन्म भौगोलिक अस्मितेतुन होत आला आहे. विविधतेतून एकता हा भारताचा आत्मा आहे. भारताच्या मोठे क्षेत्रफळ यामुळे मोगल कालीन ब्रिटीशकालीन मराठाकालीन हे विभाग इतरांपासून आपणास वेगळे मानतात त्यामुळे भौगोलिक दृष्टया प्रत्येक विभाग स्वतःला इतरांपासून वेगळा समजतो त्यातूनच वेगळेपणाची भावना वाढीस लागते आणि प्रादेशिकतेचा विचार अस्तित्वात येतो. प्रत्येक राज्याला वेगळा इतिहास व परंपरा आहे त्यामुळे त्यांना स्वतःबद्दल अभिमान वाटतो हा अभिमान प्रादेशिकतेच्या रूपाने काही वेळा प्रकट झालेला दिसतो. आज भारतीय संघराज्यात 28 घटक राज्य केंद्रशासित प्रदेश आहेत. या दोखील आंध्र प्रदेशात तेलंगणा महाराष्ट्रात विदर्भ गुजरात मध्ये सौराष्ट्र इत्यादी प्रांतांमधुन स्वतंत्र प्रादेशिक राज्य अस्तित्वाची वेळोवेळी मागणी होत आहे. वारंवार प्रादेशिक वाद कोणत्या ना कोणत्या कारणामुळे निर्माण होत असतांना आपणाला वारंवार दिसतात.

### 2) सांस्कृतिक विविधता :–

विविधतेत एकता हे भारताचे वैशिष्टय असले तरी भारतातील लोकसंख्येत विविध संस्कृतीचे लोक एकत्र राहतात हे लोक एका विशिष्ट प्रदेशावर प्रेम करतात. उत्तर भारतात आर्यांचे तर दक्षिण भारतात द्रविड यांचे वर्चस्व आहे. आर्य आणि द्रविड हा वाद सांस्कृतिक विविधतेतून जन्माला आला आहे. तामिळनाडुने तर संस्कृतिच्या आधारे भारतातून फुटुन निघुन मद्रास केरळ मैसुर मिळुन वेगळे द्रविड स्थान निर्माण करण्याचा प्रयत्न चालवला आहे. पंजाबी आपली संस्कृती वेगळी मानतात तर मुस्लीम पाकिस्तानातील संस्कृतीचा आधार घेतात त्यामुळे स्वतःची वेगळी संस्कृती व त्याची जपणुक यातून प्रादेशिकतेचा प्रश्न निर्माण करते.

### 3) धार्मिक विविधता :–

सांस्कृतिक विविधतेतून धार्मिक विविधता वाढलेली आहे. ब्रिटिशांनी भारतीय धर्म वंश खतपाणी घालुन हिंदु मुस्लिमांना वेगळे केले आणि आपले प्रशासन स्थिर ठेवले. शिखांना हिंदुंपासुन वेगळे करण्याचा यशस्वी प्रयत्न केला. ब्रिटिशांच्या या निधीतून मुस्लिमांसाठी वेगळे राज्य असावे त्यातून हिंदुस्थानची फाळणी होऊन पाकिस्तानची निर्मिती झाली असे विभागजन होऊन धार्मिक प्रश्न सुटला नाही. शिखांनी खलीस्तार, महाराष्ट्रात दलितांनी दलितस्तान, खिश्चन धार्मिक तेथुन नागालॅण्ड त्रिपुरा मेघालय मिळुन वेगळया राज्याची मागणी, तामिळनाडुने वेदांची वेगळे राज्य, नागा बंडखोरांनी नागभुमी ची मागणी या धार्मिक मागणितुन प्रादेशिकतेला वेगळे वळण लागले. त्यातून सांप्रदायिक दंगे जाळपोळ दहशतवाद इत्याची सुरूवात झाली म्हणजे धार्मिक विविधता आज प्रादेशिकतेचे मुळ कारण होऊ बसले आहे.

### 4) भाषिक विविधता :–

भारतात विविध भाषा बोलल्या जातात तरीदेखील एक भाषिक एका विशिष्ट प्रदेशात फार मोठया प्रमाणात वास्तव्य करतांना दिसतात मराठा गुजराती मारवाडी तेलगु अशा भाषा वाचक जाती अस्तित्वात आले आहे. भाषा हा घटक माणुन राज्यांची पुनर्रचना करण्यात आली त्याचा परिणाम एका भाषिक दुसऱ्या भाषिकांचा द्वेष करू लागले. हिंदीला राष्ट्रभाषेचा दर्जा देणे म्हणजे उत्तर भारतीयांचे दक्षिण भारतावर कायम वर्चस्व निर्माण करणे आहे अशा मानसिकतेत दक्षिणेकडील राज्यांमध्ये लोक वावरतात. त्यामुळे आजपर्यंत इंग्रजीची जागा हिंदीला मिळु शकली नाही. यातून प्रादेशिक पोषक वातावरण निर्माण झाले आहे. एका राष्ट्रीय भाषेचा अभाव असल्यामुळे स्वतंत्र काळापासूनच राष्ट्रीय एकात्मतेचे समोरील भाषा ही एक मोठी समस्या निर्माण झाली आहे.

### 5) आर्थिक विकासातील असमतोल :–

संघराज्याचे सर्वात महत्वाची ध्येय आर्थिक विकास हे समजले जाते म्हणजे घटक राज्यांचा विकास आणि त्याचसाठी संघराज्य अस्तित्वात आलेले असते. काही घटक राज्यांचा विकास घडवून आणणे आणि काही राज्यांकडे जाणीपूर्वक दुर्लक्ष करते. आणखी एक भाग महत्वाचा तो म्हणजे भारतीय नागरिकास एकरी नागरिकत्व आहे. तो कोणत्याही प्रांतात जाऊ शकतो राहु शकतो रोजगार करू शकतो मात्र महाराष्ट्रासारख्या प्रांतात परप्रांतियांना बऱ्याच वेळा अडवल्या जाते आणि मग यातून जो संघराज्याचा उद्देश आहे या देशात एक राष्ट्रवाद निर्माण करण्याचे ध्येय आहे हे ध्येय मागे राहतांना दिसते. प्रांता–प्रांतात तिरस्कार निर्माण होऊन प्रादेशिकतेची विचारसरणी जन्माला येते आणि विकासातील असमतोलामुळे आमच्यावर वारंवार अन्याय होतो किंवा अन्याय केला जातो अशा मानसिकता जन्माला येतात परिणामस्वरूप प्रादेशिक वाद किंवा फुटुन निघण्याची मानसिकता तयार होते.

### 6) धार्मिक दृष्टिकोन :–

धर्म कायद्याच्या राज्याला विरोध करीत असतो, धर्म विज्ञान विरोधी सुधारणा वाद्यांच्या विरोधी धर्म स्थितीप्रिय असतो धर्म कायद्याच्या समांतर स्वतःची सत्ता गाजवीत असतो. आजही भारतासारख्या देशातून लोक व्यवस्थेच्या कायद्यापेक्षा धर्माचेच संकेत पाळतात व्यवस्थेचे कायदे व्यक्तीच्या बाहय अंगावर तर धर्माचे कायदे व्यक्तीच्या अंतर्मनावर परिणाम करणारे असतात मग कायद्याला विरोध करणारा धर्म हा धर्मनिरपेक्षतेला समानतेला विरोध करणारा धर्म स्वतःच्या अस्तित्वासाठी झगडत असतो समाजमनाला चेतवीत असतो वेगळी चुल मांडवा असे शिकवीत असतो प्रादेशिकता निर्माण करीत असतो.

## 7) प्रादेशिक असमतोल :—

संघराज्याच्या निर्मितीच्या वेळी त्या काळातील परिस्थितीच्या दबावामुळे मोठी राज्य निर्माण करण्यावर भर होता पुढे भाषावार प्रांतरचनेची मागणी पुढे आल्याने 1956 प्रांतांची पुनर्रचना करण्यात आली. परंतु आकार लोकसंख्या क्षेत्रफळ इत्यादींच्या बाबतीत राज्याराज्यांमध्ये समता प्रस्थापित करता आली नाही काही राज्य लोकसंख्या प्रादेशिक विस्तार या दृष्टीने मोठे तर काही अतिशय छोटे परिणामस्वरूप लोकसंख्येच्या आधारावर प्रतिनिधीत्व दिल्यामुळे महाराष्ट्राचे लोकसभेत 48 तर राज्यसभेत 19 प्रतिनिधी आहेत. तर मेघालय यातून निवडुन आलेल्या प्रतिनिधींची संख्या लोकसभेत दोन राज्यसभेत एक एवढी आहे. स्वाभाविकपणे केंद्रात मोठया राज्यांचे वजन आणि पद जास्त असते आजही उत्तर प्रदेश बिहार यांचे महत्व आणि मेघालय त्रिपुरा यांचे महत्व वेगळया पध्दतीची दिसून येते परिणामस्वरूप यातून अलगत्वाची भावना निर्माण होते आणि प्रादेशिक वादाला हेही एक कारण बनुन पुढे येते.

## 8) संघराज्या समोर प्रादेशिक अस्मितेचे आवाहन :—

भारतीय संविधानिक तरतुदी आणि केंद्र — राज्य संबंध भेटल्यानंतर स्वायत्त प्रदेशाची मागणी का बळावली याचा साकल्याने विचार केल्यानंतर आज संघराज्य पुढे प्रांतवादाचे आवाहन कसे उग्र रूप धारण करत आहे याचाही मागोवा येथे घेणे उचित ठरते भारतात अनेक भाषा धर्म जाती आहेत. वेगवेगळे प्रांत आणि त्यांच्यातील भिन्नता मतभेद संघर्ष यामुळे प्रांतीयवाद हा महत्वाचा मुद्दा बनला आहे स्वातंत्र्यानंतर संपुर्ण देशात एक तणावपुर्ण वातावरण निर्माण होत आहे एका विशिष्ट प्रांता बद्दलचे प्रेम इतर गोष्टींपेक्षा महत्वाचे ठरते आहे. याच वेळी देशाभिमान सहिष्णुता बाजुला पडत आहे आणि इतर प्रांतात याचा द्वेष सुरू होत आहे यातुन स्वतःचा असा स्वतंत्र प्रांत निर्माण करण्याची मागणी सुरू होते भाषा धर्म विकास या कारणामुळे ती मागणी पुढे येते.

## 9) गटांचा वाढता प्रभाव :—

लोकशाहीच्या जोडीला प्रदेश भावना आले की राजकीय सहभाग वाढतो विकास कार्य लोकांनी आत्मनिर्भर व्हावे त्याशिवाय त्यांच्या राजकीय सहभाग पुर्ण होत नाही त्यासाठी बलशाली केंद्र सरकारने जो राज्यांच्या मागणी विषयी अविश्वास दाखवला तो नष्ट झाला पाहिजे प्रादेशिक भावनेतून जाती आणि जमाती यातील वरचढ गट तेथे निर्माण होणे स्वाभाविक नाही कारण एका राज्यात एकच जात स्वतःच्या बळावर सत्तारूढ होईल इतकी ती मोठी नाही जेव्हा राज्यात जातीय गटातटातील सामाजिक आर्थिक अंतर्विरोध बळावतो आणि त्यामुळे आपला प्रदेश राज्यातून बाहेर पडून त्याची राष्ट्र व्हावे ही मागणी पुढे येऊ लागते

## 10) राजकीय पक्ष :—

भारतात प्रादेशिकता निर्माण करण्यास व जोपासण्यात राजकीय पक्षांचा मोठा वाटा आहे असे गुप्ता म्हणतात कॉग्रेस पक्षापासून सुरू झालेला प्रदेश वाद हा इतर पक्षात पसरला आहे कारण स्वातंत्र्य मिळाल्याबरोबर सत्ताप्राप्तीसाठी संघर्ष केंद्र राज्य सरकार दुबळे करण्यासाठी स्थानिक प्रादेशिक पक्ष निर्माण करण्यात आले प्रादेशिक पक्ष बरोबर राष्ट्रीय पक्षांनी करार करून त्यांना जिवंत ठेवण्यास मदत केली त्यात आसाम मध्ये आसाम गण परिषद, तामिळनाडु प्रमुख आंध्र प्रदेश पंजाब केरळ जम्मु काश्मीर नॅशनल कॉन्फरन्स प्रादेशिक पक्षांनी प्रादेशिक वादास खतपाणी घातलेले पाहावयास मिळते.

## उपाय योजना :—

1) केंद्र सरकाने निपक्षपाती कारभार करावा केंद्रात सरकार कोणतेही कोणत्याही पक्षाचे असो त्यांची सामाजिक आर्थिक औद्योगिक प्रश्नांकडे त्यांनी निःपक्षपातीपणे पहावे

2) राज्या राज्याती प्रश्न केंद्र राज्यातील प्रश्न मागण्या अडचणी सोडवण्यासाठी आंतरराज्यीय मंडळाची नेमणुक करण्यात यावी.
3) प्रादेशिक पक्ष संघटना यांनी राष्ट्रहित समाज इत ही उद्दिष्टे डोळयासमोर ठेवून कार्य केले पाहिजे जनतेच्या भावना भडकावण्याचा प्रयत्न त्यांनी करू नये प्रादेशिक पक्षांची संख्या कमी करावी राष्ट्रीय पातळीवर काही मर्यादित राजकीय पक्ष असावेत.
4) केंद्र सरकारने 356 व्या कलमांचा वापर राजकीय हेतूने करू नये राज्य सरकार बरखास्त करणे विधानसभ स्थगित करणे यासारखे राजकीय सुडाने काम करू नये
5) प्रांतवादी घटकांपासून लोकांना प्रवृत्त करणारे नेतृत्व भारताला लाभले नाही ही दुर्दैवाची बाब आहे जनतेच्या मनात राष्ट्रीयत्वाची भावना अधिक तीव्र करण्यापेक्षा प्रांतिक भावना पुर्ण करणारे नेतृत्व निर्माण झाली आहेत हे कटु सत्य आहे म्हणून महात्मा गांधी जवाहरलाल नेहरू इंदिरा गांधी या नेतृत्वानं सारखे नेतृत्व नव्याने उदयाला येणे आवश्यक आहे.
6) आर्थिक सामाजिक मागासलेपण निर्मुलनासाठी विशेष प्रयत्न करणे गरजेचे आहे व्यक्तीच्या ठिकाणी असलेली धार्मिक जातीय भाषिक प्रदेश इतर या भावना पुर्णपणे नष्ट करता येणार नाहीत परंतू त्यांच्या निष्ठांची योग्य क्रमवारी लावली तर संकुचित स्वरूपाच्या अस्मिता व्यापक अस्मितांना छेद देणार नाही त्यासाठी दारिद्रय आणि सामाजिक मागासलेपण दुर करण्यास नियोजपुर्वक पावले उचलली पाहिजे.
7) राष्ट्र भावनेचा विकास राज्य राज्य अंतर्गत आदान – प्रदान साहित्य संस्कृती या क्षेत्रात संवाद नसल्याकारणाने भारतात समान राष्ट्रभाषेचा विकास होऊ शकला नाही हिंदी व हिंदी भाषिकांनी परस्परांना समजुन घेतले पाहिजे तर एकमेकांशी संपर्क साधण्याची इच्छा तीव्र होऊन एकसमान राष्ट्रभाषा विकसीत होऊन प्रादेशिकता नष्ट होण्याला मदत होईल.
8) संस्कारक्षम शिक्षण प्रणालीचा विकास, शिक्षणाद्वारे राष्ट्रीय निष्ठा विकसित होण्यासाठी शालेय जीवनापासुन विविध संस्कार मुलांवर होण आवश्यक आहे. बुध्दिप्रामाण्यवाद, धर्मनिरपेक्षता, लोकशाहीचे संस्कार मुलांवर झाले तर प्रादेशिकता जोपासली जाणार नाही.
9) अतिरेकी चळवळींना पायबंद घातला गेला पाहिजे जातीय धार्मिक भाषिक वंशीक प्रदर्शित तत्वांचा आधार घेवुन काही पुरातन वादी व प्रतिगामी विचारसरणीचे लोक देशात अतिरेकी स्वरूपाच्या चळवळी उभ्या करू पाहतात त्यांची कार्यप्रणाली पुर्णतः हुकुमशाही स्वरूपाची असते म्हणूनच या चळवळींना वेळीच पायबंद घालणे गरजेचे आहे.
10) आंतरराज्यीय मंडळ नेमावे राज्या–राज्यातील किंवा राज्य केंद्रातील प्रश्न मागण्या अडचणी सोडविण्यासाठी ती उपयुक्त ठरतील.
11) देशातील प्रत्येक राज्यातील नागरीकांनी प्रथम मी भारतीय आहे याचा विचार करावा असे झाले तर व्यापक देशासाठी विचार होईल यासाठी शब्द शिक्षण पध्दतीचा अवलंब करावा.
12) प्रादेशिकते साठी भौगोलिक इतर आर्थिक नैसर्गिक बाबींकडे दुर्लक्ष करू नये सर्व राज्यांना एकसमान नजरेने पाहिल्या गेले पाहिजे.

## सारांश :–

प्रादेशिकतेमुळे संघराज्या समोर जे आव्हान निर्माण झाले आहे या आव्हानाला सामोरे जाण्यासाठी आपण सर्व भारतीय आहोत आणि हा भारत देश माझाच आहे ही भावना जोपर्यंत देशातील प्रत्येक नागरिकांच्या मनात निर्माण होत नाही तोपर्यंत प्रादेशिकता नष्ट होणार नाही. सांप्रदायीकते पेक्षा ही भावना भयानक आहे, भयानक असे रूप प्रादेशिकतेने धारण केले आहे. कारण प्रत्येकाला आपल्या देशापेक्षा धर्म भाषा जात प्रदेश प्रिय वाटतो त्यामुळे विषमतावाद, प्रादेशिकवाद वाढतो म्हणुन वरील उपायांचे योग्य पालन केले तर प्रादेशिकता आटोक्यात आणता येते.

आजपर्यंत राजकीय पक्षांनी राजकीय स्वार्थासाठी अनेक मार्गांचा वापर केला जातीय धार्मिक प्रादेशिक द्वेष निर्माण केले या स्वार्थी कृतीतून प्रादेशिक वाद निर्माण होत राहीला. थोडक्यात संघराज्यात्मक शासन पध्दती हे विविधतेतून एकात्मता निर्माण करण्याचे साधन आहे हे साध्य करण्यासाठी देशातील राजकीय पक्ष त्यांच्या पुढारी यातील चातुर्य, समयसुचकता, दुरदृष्टी या बाबींचा वापर करून प्रादेशिक वादावर उपाय योजना करता येतील.